# ई - पोलीस पत्रिका

दि.०४/१०/२०२४ अनु.क्र.१८०

## (अमरावती शहर पोलीसांची२०२४ ची उद्दिष्टे)

- नागरिकांशी मित्रत्वाचे संबध.
- उच्च मनोबल युक्त व तणाव मुक्त पोलीस दल.
- महिला, मुले व ज्येष्ठ नागरिकांची सुरक्षा.
- जातीय सलोखा वाढविणे.
- संघटित गुन्हेगारी आणि आतंकवादी यांचे विरूद्ध कठोर कारवाई.
- रस्त्यावरील गुन्हेगारीवर नियंत्रण/सुरक्षा.
- पोलीस कोठडीत गुन्हे घडू नदेणे.
- आरोपी पोलीसांचेताब्यातून पळून जाऊ नयेत.
- “सुरक्षित व सुखकर अमरावती” हा आमचा संकल्प आम्ही व्यापक लोकसहभागातून साध्य करू.

## भाग-१

## पदोन्नती/बदली/प्रशिक्षण/रजा

## रजा

**१.पोआअ/आस्था-५/प्रसुती रजा/८७४९ /२०२४ अमरावती शहर दिनांक ०३/०९/२०२४**

**आदेश**

खालील नमुद महिला पोलीस अंमलदार यांना त्यांच्या नावासमोर दर्शविल्याप्रमाणे वैद्यकीय प्रमाणपत्राचे आधारे महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम १९८१ मधील नियम ७४ तसेच वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक अरजा-१४०९/प्र.क्रं.८/०९/सेवा-६, दिनांक २४/८/२००९ व दि.१५/१/२०१६ चे तरतुदीनुसार १८० दिवस प्रसुती रजा, रजा वेतनासह प्रसुतीच्या संभाव्य तारखेपासुन अथवा प्रसुतीकरीता रजेवर सुटल्याचे तारखेपासुन मंजुर करण्यात येत आहे.

| अ. क्र. | पदनाम/ब.नं./ नाव | नेमणुक | नियुक्ती दिनांक | प्रसुतीची वेळ | प्रसुतीची संभाव्य तारीख | अपत्यांची संख्या |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | मपोशि/५१५, ज्योत्स्ना गणेशराव सावळे(चक्रे) | पो.स्टे. गाडगेनगर | दि.१२.०८.२०१० | पहिली | २४.०१.२०२५ | -- |

वरिल नमुद महिला पोलीस अंमलदार यांना रजेवर सोडल्याचा व हजर झाल्याचा दिनांक या कार्यालयास कळवावा.

## भाग-२

## शिक्षा/निलंबन/पुन्हा स्थापना/बक्षिस/सेवानिवृत्त/मयत/नाव कमीकरण

## निरंक

## भाग-३

## वेतन/संरचना/वेतन निश्चिती/वार्षीक वेतनवाढ/संकीर्ण

## संकीर्ण

**०१.पोआअ/पशा-२/कैदी आहार भत्ता पुरवठा/७९५५/२०२४अमरावती शहर दिनांक ०४/०९/२०२४**

**पुरवठा आदेश**

**संदर्भ** :- १) या कार्यालयाची पुरवठा आदेश क्रं.:पोआअ/ पशा-२/कैदी खुराक भत्त्याबाबत नि.सु./४३७३/२०२४,दिनांक ०६/०५/२०२४

२) वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन राजापेठ यांचे पत्र क्रं. /२०२४,

दि.१८/०७/२०२४

३) कैदयांना पुरवठा करत असलेले अर्जदार नितीन अशोक वाले, यांचा दि.२६/०८/२०२४ चा अर्ज

**विषय:-** पोलीस आयुक्त अमरावती शहर आस्थापनेवरील पोलीस कोठडीतील कैदयांना भोजन पुरवठा करणेबाबत.

---०००---

पोलीस आयुक्त अमरावती शहर आस्थापनेवरील पोलीस स्टेशन राजापेठ व पोलीस स्टेशन सिटी कोतवाली येथील पोलीस कोठडीतील कैदयांना भोजन पुरवठा करणेबाबत सन २०२४-२०२५ मध्ये निविदा प्रक्रिया राबविण्यात आली होती.

निविदे प्रक्रिये अंतर्गत प्राप्त निविदा धारकामध्ये श्री. अशोक यमाजी वाले, अन्नपुर्णा भोजनालय, अनंत मंगल कार्यालय जवळ राजापेठ, अमरावती यांचे दर रुपये ९२.००/- इतर निविदा धारकाच्या तुलनेत सर्वात न्युनतम असुन खरेदी समितीचे सदस्य यांचे समोर संबंधित पुरवठादाराने नमुद केलेल्या दराबाबत विचार विनिमय करुन सर्वात न्युनतम असणारे दर मंजुर करण्यात आले होते.

परंतु अशोक यमाजी वाले यांचा दि.३०/०६/२०२४ रोजी आजाराने मृत्यू पावले असल्याने तेव्हा पासुन मय्यत यांचा मुलगा नामे नितीन अशोक वाले, अन्नपुर्णा भोजनालय, अनंत मंगल कार्यालय जवळ राजापेठ, अमरावती हे कैदयांना भोजन पुरवठा करत असुन हा आदेश प्राप्त झालेचे दिनांकेपासुन तसेच या कार्यालयाचे पुरवठा आदेश क्रं.:पोआअ/ पशा-२/कैदी खुराक भत्त्याबाबत /नि.सु./४३७३/२०२४,दिनांक ०६/०५/२०२४ नुसार कैदयांना भोजन पुरवठा करणेस तयार असुन यांना खालील नमुद अटी व शर्ती आधीन राहुन दिनांक ०५/०५/२०२५ पावेतो पुरवठा आदेश देण्यात येत आहे.

सदर नमुद अटी व शर्ती नुसार सदर आदेश प्राप्त झाल्याचे तारखेपासून सर्व पोलीस ठाण्यातील कैदयांना वेळेवर दोन वेळ खालीलप्रमाणे आहार पुरविण्यात यावा.

| अ.क्र. | विवरण | वर्णन | माप | रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | प्रति व्यक्ती एका वेळेसचे भोजन | पोळी<br>भाजी<br>तुरीची दाळ<br>मटन<br>(आठवडयातुन एकदा) | ३७५ ग्रॅम<br>१०० ग्रॅम<br>७५ ग्रॅम<br>१५० ग्रॅम | प्रतिदिन प्रतिव्यक्ती करीता ९२.००/- रु. दोन वेळेच्या भोजनाचा दर या दराने पुरविण्यांत यावा. |
| २ | आजारी कैदी | दुध | १ लिटर | - |

**अटी व शर्ती :-**

१) पुरवठा करण्यात येणारा माल हा गुणात्मक ठरवुन दिलेल्या वजनाप्रमाणे माप व चांगल्या प्रकारचा असावा.

२) पुरवठादाराने सकाळी व सांयकाळी पुर्णपणे शिजवलेल्या ताज्या व स्वच्छ ताजे अन्नाचा पुरवठा करावा. तसेच मटन ताजे दयावे.

३) पुरवठा करणा-या मालामध्ये नियमितता असली पाहिजे.

४) संबंधीताकडुन वारंवार अन्नाबाबत तक्रारी असल्यास कंत्राट रदद करण्यात येईल.

५) कैदयांना वेळेवर आहार पुरविण्यात यावा.

६) आजारी कैदयांना १ लिटर दुध आवश्यकते नुसार दोन वेळा देवुन प्रमाण पुर्ण करावे.

७) तीन महिण्यातुन किमान तिनदा प्रत्येक पोलीस निरीक्षक व पोलीस स्टेशन मधील संबंधित अंमलदार यांनी एकत्रीतपणे भोजनाचा नमुना घेऊन शासकीय अन्न प्रयोगशाळेमध्ये तपासणीसाठी पाठवावे. याबाबतच्या संपुर्ण खर्चाची जबाबदारी पुरवठाधारक म्हणुन आपली राहील. त्याबाबतचा अहवाल हया कार्यालयास देण्यांत यावा.

८) दोन्ही वेळेस तयार झालेल्या भोजनाची प्रथम संबंधित पुरवठादाराचे प्रतिनिधीने चव घेणे बंधनकारक राहील. तसेच दररोजच्या स्वतंत्र नोंदी चव रजिष्टर मध्ये नोदविण्यात याव्यात.

९) अनुदान अभावी देयक काढण्यास विलंब झाल्यास त्या रक्कमेवर कुठल्याही प्रकारचे व्याज मिळणार नाही.

१०) पुरवठाधारकांने अनावश्यक पत्रव्यवहार कार्यालयांत किंवा वरीष्ठ कार्यालयास केल्यास किंवा माहितीच्या अधिकाराचा गैरवापर केल्यास आपला दर करार रदद करण्यांचे अधिकार सदस्य सचिव समीती मा.पोलीस आयुक्त यांना राहील व पुरवठा धारकाला काळया यादीत टाकण्यात येईल.

११) वरील कोणत्याही अटीचे उल्लघंन केल्यास आपले कंत्राट रदद करण्यात येईल.

१२) पुरवठादारास पुढील निविदा होईपर्यत ९२.००/- या दराने भोजन पुरवठा करणे अनिवार्य राहील. सेवेत खंड पडू देऊ नये.

१३) कैदयांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीकोणातुन पुरवठा धारकाने काळजीपूर्वक ताजे जेवण तयार करुन पुरवावे. इतरांकडुन अथवा कैदयांच्या कुंटुंबाकडुन जेवण घेऊन ते पुरविता येणार नाही. भविष्यात जेवणाबदल अघटीत घडल्यास त्यांची सर्वशी जबाबदारी पुरवठा धारकाची राहील. पुरवठा धारकाचे विरुध्द कायदेशिर कारवाई करण्यात येईल.

वरील अटीच्या अधिन राहुन आपण पोलीस ठाण्यातील आरोपीना वर दर्शविलेल्या प्रमाणेच कैदी भत्ता पुरविण्यात यावा व काहीही त्रुटी आढळुन आल्यास आपला कंत्राट रदद करण्यात येईल. याची कृपया नोद घ्यावी.

**२. पोआअश/पशा-५/घर भाडे भत्ता-सन २०२४/८५८४/ २०२४ अमरावती दिनांक २५/०९/२०२४**

## आदेश

पोलीस आयुक्त अमरावती शहर या आस्थापनेवरील पोलीस अधिकारी/अंमलदार व मंत्रालयीन कर्मचारी यांना नियमानुसार भाडेमाफ निवासस्थानाची सोय आहे. त्यांचे शहरामध्ये स्वत:चे घर असल्यामुळे, भाडयाने राहत असल्याने व शासकीय निवासस्थान उपलब्ध/रिक्त नसल्याने/ जीर्ण/ मोडकळीस आल्यने शासन निर्णय वित्त विभाग क्रमांक घरभाडे भत्ता/१००९/ प्र.क्र.६७/सेवा-५,दिनांक २४/०८/२००९, शासन निर्णय वित्त विभाग क्रमांक घभाव-२०२२/प्र.क्र.-७/सेवा-५, दिनांक १९/०१/२०२३ व महाराष्ट्र शासन वित्त विभागाचे शासन निर्णय क्र.घभाभ-२०१९/प्र.क्र.२/सेवा-५, दि.०५.०२.२०१९ व वित्त विभाग शासन निर्णय घभाभ-१०१५/प्र.क्र.१९/सेवा-५ दिनांक १६/१२/२०१६ अन्वये ज्यावेळी सातव्या वेतन आयोगानुसार अनुज्ञेयकेलेला महागाई भत्ता हा २५ टक्याची मर्यादा ओलांडल्यानेखालील नमुदकर्मचारी यांचे नावासमोर दर्शविल्याप्रमाणे त्यांना दिनांक पासुन १८% व पोस्टे नांदगांव पेठ, वलगाव व भातकुली येथील नेमणुकीस असलेले पोलीस अधिकारी व अंमलदार यांना ९ % घरभाडे भत्ता व मंजुरकरण्यात येत आहे.

तसेच राहण्यायोग्य शासकीय निवासस्थान उपलब्ध झाल्यावर त्यांचे घरभाडे भत्ता बंद करण्यात येईल या अटीवर खालील पोलीस अधिकारी /अंमलदार यांना घरभाडे भत्ता मंजुरकरण्यात येत आहे.

| **अ.क्र.** | **पो.अधि/कर्म. नाव** | **नेमणुक** | **घरभाडे भत्ता टक्केवारी** | **घर भाडे मंजुर कालावधी** |
|---|---|---|---|---|
| १ | मपोशि / १७३ भारती दुर्गादास खंडारे, | पो.स्टे. खोलापुरी | १८ % | २४/०७/२०२४ |
| २ | पोशि/१२२ महेंद्र सुखदेवराव वानखडे. | पो.स्टे. वलगांव | ९ % | ०१/०२/२०२२२ |
| ३ | पोशि/१६९० सुरेन्द्र रघुनाथराव भोगे | पो.स्टे. फ्रेजरपुरा | १८ % | ०७/०८/२०२४ |

**(कल्पना बारवकर)**
पोलीस उपायुक्त (मुख्या.)
अमरावती शहर

प्रति,

पत्रव्यहार शाखा/सेवापट नोंदणी लिपीक/सीसीटीएनएस